॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा मार्गदर्शन केंद्रामधील विजया रायसिंग वसावे या विद्यार्थिनीची पोलीस उपनिरीक्षक या पदासाठी निवड झाली असून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी तिचे अभिनंदन केले.

विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा मार्गदर्शन केंद्रात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग सुरु आहेत. या केंद्राची विद्यार्थीनी विजया वसावे हिची पोलीस उपनिरीक्षक पदासाठी राज्य लोकसेवा आयोगाकडून निवड झाली आहे,त्याबद्दल कुलगुरुंच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्राचे संचालक डॉ.अजय सुरवाडे, समन्वयक प्रा.दीपक सोनवणे उपस्थित होते.

------------------------------------------------------------------------------------------------

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१२ ( ) : राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या वतीने महाराष्ट्रातील नवउद्योजक, विद्यार्थी आणि स्टार्टअप यांना कल्पना मांडण्यासाठी काढण्यात आलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप अंतर्गत उदया शनिवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दिवसभराची कार्यशाळा (बूटकॅम्प) आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील तरुणांच्या नवउद्योजकीय संकल्पनाद्वारे नवीन उद्योग सुरु व्हावेत व हे तरुण आत्मनिर्भर व्हावेत यासाठी महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा काढण्यात आली आहे. ४ ऑक्टोबर पासून यात्रेला प्रारंभ झाला असून ३ नोव्हेंबरला नागपूर येथे या यात्रेची सांगता होणार आहे. जळगाव येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात या यात्रेचा बूटकॅम्प होणार आहे. १३ ऑक्टोबर रोजी सिनेट सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत धुळे येथील उद्योजक श्री.जी.बी.मोदी हे प्रमुख मार्गदर्शन करणार असून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी असतील. उद्योजक आनंद कोठारी आणि धर्म सांखला हे देखील संवाद साधणार आहेत.

विद्यापीठाशी संलग्न आजी-माजी विद्यार्थी तसेच नाविन्यपूर्ण कल्पना असणारे नागरिक देखील या कार्यशाळेत सहभागी होऊ शकतील. नवीन उद्योग उभारणीच्या नाविन्यपूर्ण कल्पना यावेळी त्यांना मांडता येणार आहेत. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी प्रा.भूषण चौधरी (मो.नं.९८२३४ ५२५३९), प्रा.विकास गीते (मो.नं.९४२०० ६७३२१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 12 ऑक्टोबर,2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.12 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ.म.सु.पगारे होते. योवळी डॉ.आंबेडकर यांचा राष्ट्रवाद आणि आरक्षणाची आवश्यकता यावर गटचर्चा झाली. डॉ.पगारे यांनी डॉ.आंबेडकर यांचा राष्ट्रवाद हा शोषित, वंचित, मागासवर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा होता असे मत यावेळी मांडले.

प्रास्ताविक डॉ.भारत कडबे यांनी केले. शरद पाटील यांनी आभार मानले. या चर्चेत डॉ.विश्रांती मुंजेवार, विश्वास वळवी, पोपट गायकवाड, समाधान वाघ, सरला तायडे, केसरिया भिलाला यांनी भाग घेतला. सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या परिसरात यावेळी बोधीवृक्षाचे रोपण करण्यात आले.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 12 ऑक्टोबर,2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी